# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.04.2026** **वार- सोमवार**

---

**पत्रकार परिषद**

देशात अन्नधान्याचा पुरेसा साठा असल्याची माहिती केंद्र सरकारनं पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दिली आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत सध्या फारसे चढउतार होत नसल्याचं ग्राहक व्यवहार विभागाचे सचिव अनुपम मिश्रा यांनी नवी दिल्लीत झालेल्या आंतरमंत्रालयीन पत्रकार परिषदेत सांगितलं. सरकार वस्तूंचा पुरवठा आणि दर यावर देखरेख ठेवत असल्याचं ते म्हणाले. जागतिक अस्थिरतेतही देशात गहू आणि तांदळाचा पुरेसा राखीव साठा असून खाद्यतेलाचीही उपलब्धता स्थिर आहे असं अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाच्या सहसचिव सी. शिखा यांनी सांगितलं.

**बारामती उमेदवारी**

बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यापूर्वी आयोजित केलेल्या सभेत सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांच्या स्मृतींना श्रद्धांजली अर्पण केली.
महाआघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसनं ॲड. आकाश मोरे यांना उमेदवारी जाहीर केली आहे.
दरम्यान ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी अर्ज या निवडणुकीतून माघार घेतली आहे.

**राज्यसभा**

राज्यातल्या 5 खासदारांसह राज्यसभेच्या 19 नवनियुक्त सदस्यांनी आज पदाची शपथ घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह रामदास आठवले, ज्योती वाघमारे, माया इवनाते, रामराव वडकुटे यांना राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी खासदार पदाची शपथ दिली.

**भाजपा स्थापना दिन**

भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त आज पुण्यात पक्षाच्या कार्यालयात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. “राष्ट्र प्रथम, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः” या मूलमंत्रानुसार भाजपा देशाच्या सर्वांगीण विकासासाठी, सुशासनासाठी आणि सामान्य नागरिकांच्या सशक्तीकरणासाठी सातत्यानं कार्य करत आहे असं बावनकुळे यावेळी म्हणाले.

**अभ्यासकेंद्र लोकार्पण**

अध्यासन आणि अभ्यास केंद्रांमधून समाजाचे प्रश्न समजून घेऊन ते सोडवले जावेत या उद्देशाने विद्यापीठ काम करत असल्याचं सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी सांगितलं. विद्यापीठाच्या भटके विमुक्त अभ्यास केंद्राचं उद्घाटन कुलगुरुंच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उद्धवजी काळे यांनी यावेळी भटके विमुक्तांचा गौरवशाली इतिहास समजावून सांगितला.

**पिंपरी चिंचवड महापौर**

शहराचा विकास करताना पायाभूत सुविधांबरोबरच नागरिकांच्या आरोग्यदायी, सक्रिय आणि आनंदी जीवनशैलीसाठी आवश्यक असलेल्या सुविधा उभारणंही महत्त्वाचं आहे असं मत पिंपरी चिंचवडचे महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केलं. शहरातील मोशी बोऱ्हाडेवाडी इथल्या ॲमेनिटी स्पेस प्रकल्पाचं भूमीपूजन लांडगे यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**उद्योग पुरस्कार**

देआसरा फाउंडेशनच्या उद्योजकता पुरस्कारांचं वितरण उद्योजक डॉ. आनंद देशपांडे यांच्या हस्ते झालं. ड्रिम-50, ड्रिम-100 आणि युवा उद्योजक अशा तीन गटांमध्ये हे पुरस्कार देण्यात आले. छोटा असो वा मोठा, कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर स्वीकारणारेच उद्योग भविष्यात प्रगती करतील आणि फायद्यात राहतील, असं मत देशपांडे यांनी यावेळी व्यक्त केलं.

**पुरस्कार**

पुण्यातील संत विचार प्रबोधिनीतर्फे दिला जाणारा डॉ. रामचंद्र देखणे स्मृती पुरस्कार येत्या रविवारी मंत्री उदय सामंत आणि चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रदान केले जाणार आहेत. यंदा कीर्तन सेवा पुरस्कार पंढरपूरचे केशव महाराज नामदास यांना आणि लोककला सेवा पुरस्कार भारुडसम्राज्ञी चंदाताई तिवाडी यांना देण्यात येईल. डॉ. रामचंद्र देखणे साहित्य-कला प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भावार्थ देखणे यांनी निवेदनाद्वारे ही माहिती दिली.

**परिसंवाद**

पुण्यातील बहुरंग संस्थेनं येत्या शनिवारी आदिवासी संगीत, सिनेसंगीतावर बोलू काही या विषयावर परिसंवाद आयोजित केला आहे. प्राची वैद्य-दुबळे, डॉ. चैतन्य कुंटे, डॉ. अनिल माकोडे, शंभूगोंड कोहचाडे, प्रा. हेमंत भागवत, डॉ. स्वप्नील चाफेकर या परिसंवादात सहभागी होणार आहेत. घोले रस्त्यावरील जवाहरलाल नेहरु सांस्कृतिक भवनात होणाऱ्या या कार्यक्रमात बहुरंग भूषण पुरस्कारांचंही वितरण होणार आहे. मनोहर जुवाटकर आणि श्रीवल्लभ मोरे यांचा या पुरस्कारानं गौरव केला जाणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुंडलिक केदारी यांनी दिली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 32 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या आकाश निरभ्र असेल आणि कमाल तापमानात काहीशी वाढ होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**